अस्सल सोलापुरी
# सुराज्य सोलापूर
। शनिवार, दि. २४ ऑगस्ट २०२४ । पान : ३

## 'मविआ'चे टेन्शन वाढवणारी आकडेवारी! विधानसभेला बसू शकतो झटका?

✔ **मुंबई** : लोकसभा निवडणुकीपाठोपाठ महाराष्ट्रात आता विधानसभा निवडणूक होऊ घातली आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले, तर महायुतीला जबर फटका बसला.

पण, आगामी विधानसभा निवडणुकीआधी समोर आलेल्या सर्व्हेच्या आकडेवारीने मविआची चिंता वाढवली आहे. मूड ऑफ द नेशन सर्व्हेमध्ये महत्त्वाची मुद्दा अधोरेखित करण्यात आला आहे.

नव्या सर्व्हेनुसार महाराष्ट्रातील मतदारांचा कल आता बदलला आहे. आजघडीला लोकसभा निवडणूक झाल्यास भाजप आणि काँग्रेसच्या तीन जागा वाढतील, असा या सर्व्हेत म्हटले आहे.

या सर्व्हेतील आकडेवारीनुसार, महाविकास आघाडीच्या कामगिरीवर समाधानी असलेल्या लोकांपेक्षा असमाधानी असलेल्या लोकांची संख्या जास्त आहे. मविआच्या कामावर ११ टक्के लोकांनी समाधान व्यक्त केले आहे. तर २१ टक्के लोक थोडे अधिक समाधानी आहेत. मात्र, ३० टक्के लोकांनी महाविकास आघाडीच्या कामावर समाधानी नसल्याचे मत नोंदवले आहेत.

महायुती सरकारच्या कामावर समाधानी असल्याचे २५ टक्के लोकांनी म्हटले आहे. तर ३५ टक्के लोक थोडे जास्त समाधानी आहेत. ३० टक्के लोकांनी मात्र महायुती सरकारच्या कामावर समाधानी नसल्याचे म्हटले आहे.

# भावाच्या धाडसाने बहिणीच्या पापाचा छडा भाचीला वाचवून मामाने दिला धडा

## साडे तीन लाखांना पोटच्या अल्पवयीन मुलीला विकून लग्न लावले

● माढ्यातील धक्कादायक प्रकार ● पीडित मुलीची आपबीती ● लग्न लावणाऱ्या दोघांना अटक



✔ सोलापूर-कुर्डूवाडी/प्रतिनिधी

**मुलींवर अत्याचार, बलात्कार आणि अपहरण अशा घटनांनी महाराष्ट्राचे मन विषण्ण झालेले असतानाच सोलापूर जिल्ह्यात एक संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. एका आईने पोटचा गोळा असलेल्या अल्पवयीन मुलीला चक्क साडे तीन लाखांना विकून तिचे लग्न लावल्याचा प्रकार उजेडात आला आहे. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून ग्रामीण पोलीस दल या प्रकरणाचा कसून तपास करत आहे.**

झाले असे की, एका अल्पवयीन मागास मुलीला तिच्या इच्छेविरुद्ध जन्मदात्रीनेच साडेतीन लाख रुपयांस विकून एका तरुणाशी लग्न लावून दिल्याचा धक्कादायक प्रकार सोलापुरात उजेडात आला. याप्रकरणी पीडित मुलीने मामाच्या मदतीने पोलिसांत धाव घेऊन कैफियत मांडली. त्यानुसार पोलिसांनी पीडितेच्या आईसह नवरा, सासरा व इतरांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

सोलापुरातील फौजदार चावडी पोलीस ठाण्यात शून्य क्रमांकाने दाखल झालेल्या फिर्यादीनुसार, अनुसूचित जातीची पीडित मुलगी (वय १५, वर्षे १० महिने) मूळची लातूर येथील राहणारी असून, तिचे वडील रंगकाम करून कुटुंब चालवितात. मागील काही दिवसांपासून आई तिच्या लग्नासाठी स्थळ शोधत होती.

शेजारच्या महिलेने पीडित मुलीसाठी स्थळ आणले. त्यानुसार पीडित मुलीला घेऊन आई व शेजारच्या महिलेसह अन्य मंडळी सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यात आली. तेथे घाई गडबडीत मुलीचा साखरपुडा उरकण्यात आला. नंतर तीनच दिवसांनी तिचे लग्नही लावून देण्यात आले. तत्पूर्वी, पीडित मुलीने आताच लग्न करायची इच्छा नसल्याने मामाशी गुपचूप मोबाइलद्वारे संपर्क साधून आपबीती सांगितली. त्याच वेळी आईने पीडित मुलीला फोन करून, मी तुझ्या नवऱ्याकडून पैसे घेऊन तुझे लग्न लावून दिले आहे, असे कळविले. त्यानंतर पीडित मुलीने नवऱ्याला विचारणा केली असता त्याने, तू हलक्या जातीची असल्यामुळे तुझ्या आईला साडेतीन लाख रुपये देऊन मी तुला विकत घेतले आहे. तू तुझ्या लायकीप्रमाणे आमच्याकडे गुपचूप राहा, असा दम भरला. लग्नाच्या रात्री घरात नवऱ्याने पीडित मुलीचा विनयभंग केला. शेवटी हे लग्न आपल्या इच्छेविरुद्ध झाल्याने पीडित मुलीने सोलापुरातील आपल्या मामाशी संपर्क साधून, त्याच्या मदतीने सोलापूर गाठले आणि पोलिसांत धाव घेतली. आरोपींविरुद्ध अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम, बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, बाललैंगिक शोषण प्रतिबंधक कायद्यानुसार हा गुन्हा फौजदार चावडी पोलिसांनी नोंदवून कुर्डूवाडी पोलीस ठाण्यास वर्ग करण्यात आला आहे.

> गुन्हा आमच्याकडे वर्ग झाल्यानंतर तपास सुरू केला आहे.बालविवाह कायदा मोडून लग्न लावले आहे.मुलगी अल्पवयीन आहे.त्यामुळे बालप्रतिबंधक कायदा आणि पोक्सो नियमांतर्गत त्या मुलीचे लग्न लावून देणारा आणि त्याचे वडील अशा दोघांना अटक करण्यात आली आहे.
>
> **–पाटील (पोलीस उपअधीक्षक)**

# जबरदस्त दणका सणसणीत चपराक



✔ **मुंबई** : बदलापूरच्या प्रकरणावर शनिवारी २४ ऑगस्टला महाविकास आघाडीने पुकारलेले महाराष्ट्र बंद हे आंदोलन मुंबई उच्च न्यायालयाने बेकायदा ठरवले आहे. न्यायालयाचा दणका बसताच आघाडीच्या नेत्यांनी बंदपासून अक्षरशः पळ काढला.

कुणीही बंद पुकारू नये,असे फर्मान आघाडीचे शिल्पकार शरद पवार यांनी आपल्या चेल्यांना सोडले.कोणत्या प्रकरणावर बंद पुकारावे याला काही तारतम्य आहे की नाही,अशी संतप्त भावना विचारवंत आणि सर्वसामान्यांमधून व्यक्त झाली होती तरी देखील विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर बंदच्या माध्यमातून तवा तापवला आणि राजकीय पोळी भाजून घेण्याचा उद्योग चालवला होता पण न्यायालयाने वेळीच त्याची दखल घेवून आघाडीचे कान उपटले आणि बंद नियमबाह्य ठरवला.कोर्टाच्या निर्णयातून लोकशाहीचा विजय झाल्याने सर्वसामान्यांमधून आनंद व्यक्त होत आहे. बदलापूरच्या प्रकरणाचे राजकीय भांडवल करून महाविकास आघाडीने आज महाराष्ट्र बंदची हाक दिली होती. अशा प्रकारे बंद घोषित करणे बेकायदा असून कोणत्याही पक्षाला बंद पुकारण्याचा अधिकार नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाचा शुक्रवारी दिला आहे. राज्यात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांचा निषेध नोंदवण्यासाठी महाविकास आघाडीने बंदची हाक दिली होती. उच्च न्यायालयाचा हा निर्देश महाविकास आघाडीसाठी मोठा धक्का आहे. यावरून आता पुन्हा एकदा राज्यातील राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे. महाविकास आघाडीच्या या बंद विरोधात शुक्रवारीच ॲड. गुणरत सदावर्ते यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर तातडीची सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाने अशाप्रकारे बंद घोषीत करता येणार नाही, असे स्पष्ट केले. तसेच बंद घोषीत करणे बेकायदा असून जर उद्या कुणी अशाप्रकारे बंद पुकारतील त्यांच्यावर कारवाई करा, असे निर्देशही न्यायालयाने दिले.

### तीनही पक्षांना बसला दणका...

महाविकास आघाडीचे नेते उद्धव ठाकरे, शरद पवार आणि नाना पटोले यांनी राज्यातील जनतेला महाराष्ट्र बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले होते. उद्याचा बंद हा विकृती विरुद्ध संस्कृती, असा असून हा बंद राजकारणासाठी नाही, अशी भूमिका उद्धव ठाकरे यांनी मांडली होती. न्यायालयाच्या निकालाने आघाडीतील तीनही पक्षांना दणका बसला आहे. संविधानाचा आदर राखून बंद मागे घ्या,असे आवाहन पवार यांनी केले आहे.



तोंडावर आपटले | कचाट्यात सापडले

### कचाट्यात सापडले

✔ **मुंबई** : राज्यपाल नामनिर्देशित १२ आमदारांच्या नियुक्तीबाबत मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी एक महत्वपूर्ण निर्णय दिला. ज्या नियुक्त्या दोन वर्षात झाल्या नाहीत, त्या काही लगेच होणार नाहीत, असे म्हणत मुख्य न्यायमूर्तींनी याचिकाकर्त्यांना दिलासा दिला आहे. या निर्णयाने महासुतीच्या सरकारला सणसणीत चपराक बसली आहे.

याचिका १ ऑक्टोबरपर्यंत तहकूब करण्यात आली आहे. पुढील सुनावणीपर्यंत नियुक्त्या न करण्याचे निर्देश देण्याची विनंती याचिकाकर्त्यांनी कोर्टाकडे केली होती.त्यावर सुनावणी झाली. आता राज्यपाल नामनिर्देशित १२ आमदारांची नियुक्ती रखडल्याने महायुती सरकारसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात या १२ आमदारांच्या नियुक्तीसाठी तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना यादी देण्यात आली होती. कोश्यारी यांनी या नियुक्त्याा अडवून धरल्या होत्याा. याबाबत शिवसेना ठाकरे गटाचे कोल्हापूर शहरप्रमुख सुनील मोदी यांनी हायकोर्टात याचिका दाखल केली आहे.

जून २०२० मध्ये महाविकास आघाडी सरकारने बारा आमदारांची नियुक्ती करण्यासाठी राज्यपालांना शिफारस केली होती. तत्कालीन राज्यपालांनी ती यादी मंजूर केली नाही.

तसेच ती यादी फेटाळलीही नाही. त्यानंतर याप्रकरणी न्यायालयीन वाद सुरू झाला. राज्यात सत्तांतर झाल्यानंतर महायुती सरकारने पूर्वीच्या सरकारने शिफारस केलेली यादी मागे घेतली. तसेच आपली नवीन यादी राज्यपालांकडे पाठवली. हा निर्णय बेकायदा असून महाविकास आघाडीने दिलेल्या यादीनुसार आमदारांची नियुक्ती करा अन्यथा ही यादी मागे घेण्याचे सविस्तर कारण द्या, अशी मागणी याचिकेतून करण्यात आली आहे. राज्य सरकारचा या याचिकेस विरोध आहे. यादी मागे घेणे हा राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेला निर्णय असल्याचे स्पष्टीकरण राज्य सरकारने दिले आहे.

### नियुक्त्या कधी होणार?

दरम्यान, विधानपरिषदेतील १२ आमदार राज्यपालांद्वारे नियुक्त केले जात असतात. महाविकास आघाडीचे १२ आमदारांच्या नावांची यादी राज्यपालांकडे पाठवली होती. त्यानंतर सरकार बदलले आणि त्यांनी ही यादी परत पाठवली. शिवाय नवीन यादी देण्यासही त्यांनी सुचवले होते. आता या नियुक्त्या नेमक्या कधी होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महाविकास आघाडीने पुकारलेला सोलापूर बंद मागे

✔ सोलापूर/प्रतिनिधी

कोलकाता व बदलापूर येथील अमानवी घटनेने निषेधार्थ महाविकास आघाडीच्या वतीने महाराष्ट्र बंद ची हाक दिली होती परंतु सर्वोच्च न्यायालयाने बंद करू नये असे आवाहन केल्याने हा बंद मागे घेत असल्याचे माजी आमदार आडम मास्तर यांनी सांगितले.

न्यायालयाचा मान राखत महाविकास आघडीने पुकारलेला बंद मागे घेत असून सर्व दैन्यदिन व्यवहार,बाजारपेठा आणि जनजीवन सुरळीत चालू राहतील आणि कोणीही बंद पाळू नये.

महाविकास आघडीतील सर्व घटक पक्षाचे कार्यकर्ते पूनम गेट येथे निषेध व्यक्त करण्यासाठी निदर्शने करतील, अशी प्रतिक्रिया ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर आणि काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी दिली.

**मराठा आरक्षणासाठी**

## करमाळ्यात माजी नगरसेवकाची चिट्ठी लिहून आत्महत्या


✔ करमाळा/प्रतिनिधी

मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून मराठा समाजाच्या अनेक जणांकडून एकापाठोपाठ एक अशा आत्महत्येच्या घटना घडल्या आहेत. सोलापूर जिल्ह्यातील करमाळ्याचे माजी नगरसेवक बलभीम विष्णू राखुंडे (वय-८०, रा. कानाड गल्ली, करमाळा) यांनी 'मराठा आरक्षण मिळत नाही म्हणून आत्महत्या करीत आहे' अशा आशयाची चिट्ठी लिहून राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली आहे.

शहरातील बलभीम राखुंडे हे मराठा महासंघाचे तालुकाध्यक्ष असून ते करमाळ्याचे दहा वर्षे नगरसेवक राहिलेले आहेत. त्यांनी 'मराठा समाजाला आरक्षण मिळत नाही म्हणून आत्महत्या करत आहे माझी कोणतीही तक्रार नाही मराठा आरक्षणासाठी माझा मनोज जरांगे यांना पाठिंबा आहे' अशा आशयाची चिट्ठी लिहून खाली आत्महत्या केली. यानंतर करमाळा पोलिसांनी राखुंडे यांचा मृतदेह करमाळा उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवला. माजी नगरसेवक बलभीमदादा राखुंडे यांच्या पाठीमागे तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे पंतवंडे असा परिवार आहे. शवविच्छेदनानंतर शुक्रवारी सायंकाळी पाच वाजता त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

> बलभीम दादा मराठा चळवळीचे जुने कार्यकर्ते होते. मराठा आरक्षणासाठीही ते सुरुवातीपासून आग्रही होते. गोरगरीब मराठा तरुणांना नोकरीसाठी आरक्षण पाहिजे, ही त्यांची कायम तळमळ होती. त्यामुळे ते मराठा आरक्षणासाठी नेहमी प्रयत्नशील होते. त्यांच्या जाण्याने मराठा समाजात पोकळी निर्माण झाली असून सर्व समाज शोकसागरात बुडाला आहे.
>
> **– सुनील सावंत, सकल मराठा समाज, करमाळा**





## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



फिर वही दिल लाया हूँ !!!

कल्याण
189-89-144

मुंबई
177-58-459

**जि.प. शिक्षकांच्या प्रशिक्षण कार्यशाळेचे नियोजन कोलमडले**

## प्रशिक्षण कार्यशाळा की श्रावणातले प्रवचन? शिक्षकांचा सवाल

✔ सोलापूर/प्रतिनिधी

जिल्हा परिषद शिक्षकांच्या प्रशिक्षण कार्यशाळेचे नियोजन कोलमडल्यामुळे शिक्षकांमध्ये बैठक व्यवस्थेत गोंधळ उडाला. त्यामुळे हे प्रशिक्षण कार्यशाळा आहे की श्रावण मासमधील प्रवचन आहे, असा संतप्त सवाल बसायला जागा न मिळालेल्या शिक्षकांमधून व्यक्त केला जात आहे.

बदलापूरच्या घटनेनंतर शिक्षण विभागात शासन गांभीर्यपूर्वक बदल करण्याच्या विचारात असतानाच सोलापूर जि.प.च्या शिक्षकांसाठी आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमातच गोंधळ उडाला. गुरुवारी सिंहगड कॉलेजमध्ये आयोजित प्रशिक्षणात शिक्षकांना बसण्यासाठी जागाही नव्हती अशा तक्रारी आल्या आहेत. बदलापूर घटनेनंतर शासनाने सर्व शाळांमध्ये सीसी कॅमेरे बसवण्याचा आदेश दिला आहे. कित्येक कॅमेऱ्यामध्ये डेट व टाइमिंग सेट केले नसल्याचे समोर आले आहे. यावर गंभीर चर्चा होत असतानाच सोलापूर जिल्हा परिषद शिक्षण विभागाने गुरुवारी मोहोळ, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, व अक्कलकोट तालुक्यातील शिक्षकांसाठी प्रशिक्षण आयोजित केले होते. या प्रशिक्षणाला शिक्षकांची उपस्थिती इतकी मोठी होते की सभागृह अपुरे पडले. मिळेल त्या जागेवर बसून शिक्षकांनी प्रशिक्षणाची हजेरी पूर्ण केली पण या प्रशिक्षणाचा हेतू साध्य झाला का? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

या प्रशिक्षणात मार्गदर्शनासाठी प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख उपस्थित होते. त्यांनी उपस्थित शिक्षकांना मार्गदर्शन केले पण शेवटच्या खुर्चीवर बसलेल्या शिक्षकांना व बाहेर मिळेल तिथे जागा धरून बसलेल्या शिक्षकांना त्यांचा आवाज ऐकू गेलाच नाही. अशा या प्रशिक्षणाचे नियोजन कोणी केले? असा सवाल शिक्षकांनी उपस्थित केला आहे.



**सोलापूर : सभागृहात जागा न मिळाल्याने शिक्षक अशाप्रकारे बाहेर बसून होते.**

### शिक्षणाधिकाऱ्यांनी केल्या सूचना

या प्रशिक्षणात शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी आदर्श गुणवत्तेचा संवाद साधून उपस्थित शिक्षकांना सूचना केल्या. किती शाळांचा पट वाढला? विद्यांजली पोर्टल नोंदणी करा, माझी शाळा सुंदर शाळा नोंदणी करून उपक्रम राबवा. कोणत्याही शिक्षकाला क्षुल्लक कामासाठी सोडू नका. अवांतर वाचन करणारे शिक्षक किती आहेत? सखी सावित्री समिती स्थापन करा. विद्यार्थी महाविकास अभियानाकडे गांभिर्याने लक्ष द्या यासह विविध सूचना केल्या.

## मुख्यमंत्र्यांच्या गावातच मुलीच असुरक्षित तर राज्यात काय स्थिती

### प्रियांका गुप्ता यांचा सवाल

✔ सोलापूर/प्रतिनिधी

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे जिल्ह्याततच मुली सुरक्षित नाहीत, तर ठिकाणी काय स्थिती असेल असा प्रश्न विचारत बदलापूर घटनेची संपूर्ण जबाबदारी स्वीकारून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी उत्तर प्रदेश काँग्रेसच्या प्रवक्त्या प्रियांका गुप्ता यांनी सोलापुरात केली.

काँग्रेस भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्या म्हणाल्या, सरकार तुमचे आहे, गृह विभाग तुमच्याकडे आहे, बदलापूर घटनेत आंदोलन करणाऱ्या ३०० जणांवर गुन्हे दाखल झाले, ७० आंदोलकांना अटक झाली, पोलिसांच्या प्रक्रियेवर संशय निर्माण होतो.

या घटनेला शाळा प्रशासन जबाबदार नाही का, शाळा व्यवस्थापनाला वाचविण्याचा प्रयत्न केला जात असून राज्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात सरकारला अपयश आले आहे.

त्यामुळे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माफी मागावी. महिलांवर अत्याचार वाढले, बेटी बचाव अभियान कुठे आहे, त्याचा निधी निवडणुकांवर खर्च केला जातो असा आरोप करत या घटनेत पीडितेला न्याय मिळाला पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.